# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २०/०३/२०२० रोजी सभा सुचना क्र. १३ दि. १६/०३/२०२० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सायंकाळी ०४.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. अशोक तिवारी हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक सुर्यदेव तिवारी | सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ५. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ६. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ७. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ८. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| ९. | श्री. संजय अनंत थेराडे | सदस्य |
| १०. | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | सदस्या |
| ११. | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी | सदस्या |
| १२. | श्री. दिनेश तेजराज जैन | सदस्य |
| १३. | श्री. एलायस दुमिंग बांड्या | सदस्य |
| १४. | श्री. कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| १५. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| १६. | श्रीम. गिता हरीश परदेशी | सदस्या |

गैरहजर सदस्य - निरंक

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभा चालू करण्यात यावी.

**नगरसचिव :-**

सार्व. बांधकाम विभागाकडून अनुसूची ड प्रकरण 2 कलम के अन्वये प्रस्ताव आलेला आहे . हा प्रस्ताव घेणेसाठी सभागृहाची मान्यता आहे का?

**सभापती :-**

सदर विषय के अन्वये शेवटी घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 157, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र . १८४ मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ मिरारोड (पू.) तसेच मिरारोड रेल्वे समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लँडीग जवळ) येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**राकेश शहा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (ए) आरक्षण क्र. १८४ मिरारोड रेल्वेस्टेशन जवळ, मिरारोड (पू.) येथे वाहनतळ चालविणेकरीता तसेच (बी) - तसेच उपरोक्त पे. ॲन्ड पार्क लगत (वाहनतळ) येथील मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लँडीग जवळ ) वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेबाबत निविदा दि. ०९/०१/२०२० रोजीच्या दै. मुंबई मित्र व दै. मुंबई चौफेर या वृत्तपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द केलेली होती . सदर कामी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा कालावधीत सहा निविदा धारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या असून दि. २८/०१/२०२० रोजी उघडण्यात आले असता सदर निविदेमध्ये १) मे. ए वन केअरटेकर प्रा.लि. २) मे. आशुतोष इंटरप्रायजेस ३) मे. बरकत कॉन्ट्रॅक्टर ४) मे. जे.टी. रोंदळ ५) मे. श्री. साई गणेश कंन्स्ट्रक्शन यांनी निविदेतील अटीशर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने मा. निविदा समितीने दि. १०/०२/२०२० रोजी दराचा लिफाफा (Financial Bid) उघडण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार दि. १३/०२/२०२० रोजी सदर पात्र निविदाकारांचे दराचा लिफाफा (Financial Bid) उघडण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| निविदेमधील वार्षिक मुल्याधिकारीक रक्कम रुपये. | निविदाधारकाने निविदेतील सादर केलेले वार्षिक रक्कम | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मे. ए वन केअरटेकर प्रा.लि. | मे. आशुतोष इंटरप्रायजेस | मे. बरकत कॉन्ट्रॅक्टर | मे. जे.टी. रोंदळ | मे. श्री. साई गणेश कंन्स्ट्रक्शन |
| प्रथम वर्ष रु. ९१,७१,८००/- | ९४,७७,९००/- | १,०९,००,०००/- | ९१,७५,८००/- | १,०१,००,०००/- | १,०२,००,०००/- |
| द्वितीय वर्ष रु. ९१,७१,८००/- | ९४,७७,९००/ | १,१९,८०,०००/- | ९१,७५,८००/ | १,०१,००,०००/ | १,०२,००,०००/ |
| तिसरे वर्ष रु. ९१,७१,८००/- | ९४,७७,९००/ | १,३१,२०,०००/- | ९१,७५,८००/ | १,०१,००,०००/ | १,०२,००,०००/ |
| एकूण रु. २,७५,१५,४००/- | २,८४,३३,७००/- | ३,६०,००,०००/- | २,७५,२७,४००/- | ३,०३,००,०००/- | ३,०६,००,०००/- |

वरील मे. आशुतोष इंटरप्रायजेस यांनी उधृत केलेले दर वाजवी स्वरुपाचे आहेत तसेच मे. आशुतोष इंटरप्रायजेस यांना त्यांनी सादर केलेली रक्कम रु. ३,६०,००,०००/- वर १८% जी.एस.टी. भरणे बंधनकारक राहिल. तरी मे. आशुतोष इंटरप्रायजेस यांना पे ॲन्ड पार्क ठेका पध्दतीने चालविणेकरीता मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. 157 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. १८४ मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ मिरारोड (पू.) तसेच मिरारोड रेल्वे समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लँडीग जवळ) येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. 131 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (ए) आरक्षण क्र. १८४ मिरारोड रेल्वेस्टेशन जवळ, मिरारोड (पू.) येथे वाहनतळ चालविणेकरीता तसेच (बी) - तसेच उपरोक्त पे. ॲन्ड पार्क लगत (वाहनतळ) येथील मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लँडीग जवळ ) वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेबाबत निविदा दि. ०९/०१/२०२० रोजीच्या दै. मुंबई मित्र व दै. मुंबई चौफेर या वृत्तपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द केलेली होती . सदर कामी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा कालावधीत सहा निविदा धारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या असून दि. २८/०१/२०२० रोजी उघडण्यात आले असता सदर

निविदेमध्ये १) मे. ए वन केअरटेकर प्रा.लि. २) मे. आशुतोष इंटरप्रायजेस ३) मे. बरकत कॉन्ट्रॅक्टर ४) मे. जे.टी. रोंदळ ५) मे. श्री. साई गणेश कंन्स्ट्रक्शन यांनी निविदेतील अटीशर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने मा. निविदा समितीने दि. १०/०२/२०२० रोजी दराचा लिफाफा (Financial Bid) उघडण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार दि. १३/०२/२०२० रोजी सदर पात्र निविदाकारांचे दराचा लिफाफा (Financial Bid) उघडण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| निविदेमधील वार्षिक मुल्याधिकारीक रक्कम रुपये. | निविदाधारकाने निविदेतील सादर केलेले वार्षिक रक्कम | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मे. ए वन केअरटेकर प्रा.लि. | मे. आशुतोष इंटरप्रायजेस | मे. बरकत कॉन्ट्रॅक्टर | मे. जे.टी. रोंदळ | मे. श्री. साई गणेश कंन्स्ट्रक्शन |
| प्रथम वर्ष रु. ९१,७१,८००/- | ९४,७७,९००/- | १,०९,००,०००/- | ९१,७५,८००/- | १,०१,००,०००/- | १,०२,००,०००/- |
| द्‌वितीय वर्ष रु. ९१,७१,८००/- | ९४,७७,९००/ | १,१९,८०,०००/- | ९१,७५,८००/ | १,०१,००,०००/ | १,०२,००,०००/ |
| तिसरे वर्ष रु. ९१,७१,८००/- | ९४,७७,९००/ | १,३१,२०,०००/- | ९१,७५,८००/ | १,०१,००,०००/ | १,०२,००,०००/ |
| एकूण रु. २,७५,१५,४००/- | २,८४,३३,७००/- | ३,६०,००,०००/- | २,७५,२७,४००/- | ३,०३,००,०००/- | ३,०६,००,०००/- |

वरील मे. आशुतोष इंटरप्रायजेस यांनी उधृत केलेले दर वाजवी स्वरुपाचे आहेत तसेच मे. आशुतोष इंटरप्रायजेस यांना त्यांनी सादर केलेली रक्कम रु . ३,६०,००,०००/- वर १८% जी.एस.टी. भरणे बंधनकारक राहिल. तरी मे. आशुतोष इंटरप्रायजेस यांना पे ॲन्ड पार्क ठेका पध्दतीने चालविणेकरीता मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्ररकण क्र. 158, साप्ताहिक लेखा परिक्षण अहवाल सादर करणेबाबत . विषय प्रलंबित ठेवण्यात आला.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 159, परिवहन सेवेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ /घट आणि त्यासनुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे . अंतिम मान्यतेसाठी मा . महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2019-20 चे सुधारीत | 2020-21 चे मुळ |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | 6623.35 | 5033.80 |
| परिवहन खर्च | 6606.85 | 5013.28 |
| अखेरीची शिल्लक | **16.50** | **20.52** |

**राकेश शाह :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. सभापती :-**

**ठराव मंजूर.**

**प्रकरण क्र. 159 :-**

**परिवहन सेवेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. 132 :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ /घट आणि त्याअ्नुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे . अंतिम मान्यतेसाठी मा . महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.**

**(रु. लाखांत)**

| तपशिल | 2019-20 चे सुधारीत | 2020-21 चे मुळ |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | 6623.35 | 5033.80 |
| परिवहन खर्च | 6606.85 | 5013.28 |
| अखेरीची शिल्लक | **16.50** | **20.52** |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 160, अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**राकेश शहा :-**

**मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगर पालिका यांनी सादर केलेले अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे अग्निशमन लेखाशिर्षनिहाय वाढ/घट तसेच इतर दुरुस्त्या करुन अग्निशमन विभागाच्या अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे . अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.**

**(रु. लाखांत)**

| तपशिल | 2019-20 चे सुधारीत | 2020-21 चे मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 4224.11 | 4875.95 |
| एकूण खर्च | 1923.75 | 4853.40 |
| **अखेरीची शिल्लक** | **2300.36** | **22.55** |

**दिनेश जैन :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. सभापती :-**

**ठराव मंजूर.**

**प्रकरण क्र. 160 :-**

**अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. 133 :-**

**मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे अग्निशमन लेखाशिर्षनिहाय वाढ/घट तसेच इतर दुरुस्त्या करुन अग्निशमन विभागाच्या अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे . अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.**

**(रु. लाखांत)**

| तपशिल | 2019-20 चे सुधारीत | 2020-21 चे मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 4224.11 | 4875.95 |
| एकूण खर्च | 1923.75 | 4853.40 |
| **अखेरीची शिल्लक** | **2300.36** | **22.55** |

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 161, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत . ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण " + "अंध व अपंग " + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण")**

**धृवकिशोर पाटील :-**

**पेज नं. 18,26 नंबर त्याच्यामध्ये शासन कामासाठी अनुदान.**

**शरद बेलवटे :-**

**फक्त 12 कोटी शासनाकडून मिळालेले आहे. 12 कोटीचे पत्र शासनाकडून आले आहे. 25 कोटीचे शासनाकडून नाही.**

**धृवकिशोर पाटील :-**

**ह्याचे पत्र शासनाकडून आलेले नाही.**

**शरद बेलवटे :-**

**विभागाने माहिती दिलेली आहे.**

**धृवकिशोर पाटील :-**

**विभागाने चुकीची माहिती दिलेली आहे . शासनाकडून पत्र आले तरच त्याला अथॉन्टीकेशन देऊ शकतो आणि शासनाकडून पत्र जर नाही आले समजा जर तुम्ही बजेट धरले आहे त्याप्रमाणे बजेटची प्रोव्हिजन केली उद्या तुम्ही काम काढले.**

**शरद बेलवटे :-**

**बाकीचे आपण तसेच पकडले आहेत. अनुदान आहे घनकचरा आहे विभागाने जे अपेक्षित दिले आहे त्याप्रमाणेच केले आहे.**

**धृवकिशोर पाटील :-**

**एक असतो मिरा भाईंदर शहरासाठी आणि एक असतो पर्टीक्यूलर एरियासाठी तो संपूर्ण मिरा भाईंदर शहरासाठी होता आणि हा पर्टीक्यूलर काही कामासाठी आहे. त्यामुळे ह्याच्यामध्ये शासनाचे पत्र जर आले नाही तर आपण हे कसे काय करतो.**

**शरद बेलवटे :-**

**मला हे दिले आहे.**

**अनिल सावंत :-**

**तुम्हाला पी.डब्ल्यू.डी. ने दिले आहे.**

**शरद बेलवटे :-**

**पी.डब्ल्यू.डी. ने दिले आहे त्यांचे पत्र पण आहे.**

**अनिल सावंत :-**

**शासन अनुदान आल्यावर काम चालू करतील . आपण आता जमा आणि खर्च दोन्ही दाखवतो त्यामध्ये महापालिका फंड जात नाही.**

**धृवकिशोर पाटील :-**

**काम केले असेल ना.**

**अनिल सावंत :-**

**अनुदान आल्याशिवाय काम कसे करणार.**

**धृवकिशोर पाटील :-**

**मागच्या स्टॅन्डिंगने त्याला मंजूर केले.**

**अनिल सावंत :-**

**त्याच्यामध्ये महापालिका तरतूद ठेवली होती.**

**धृवकिशोर पाटील :-**

फक्त एक करोड ठेवली होती . शासन पत्र येईल म्हणून तो विषय मंजूर केला . विषय सेन्सेटिव्ह होता वादविवाद नको म्हणून ते मंजूर केले . पण आता कमीत कमी शासनाकडून ऑथोन्टी केशन तरी पाहिजे.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाचे काय म्हणणे आहे विषय मिटवून टाका.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

वेळोवेळी निविदा काढली आहे . आज बजेट अंतिम करायला बसलेला आहात . शासनाने वेळोवेळी काम आणली आहेत. त्याप्रमाणे प्रोव्हिजन करावी. प्रस्तावित केले आहे ते मंजूर करावे अशी आमची अपेक्षा आहे.

**अनिल सावंत :-**

ठीक आहे करुन टाका.

**धृवकिशोर पाटील :-**

बाळासाहेब ठाकरे कलादालनाकरीता प्रशासनाने फक्त एक करोड तरतूद केलेली आहे पेज नं. 43.

**अनिल सावंत :-**

40 ते 60 मध्ये ते सुध्दा आले ना. तो वेगळा विषय प्रशासनाने भुमिका स्पष्ट करा विषय मिटवून टाका.

**निला सोंस :-**

प्रशासन से मेरा सवाल है अगर टेंडर 5 से 10 करोड लास्ट स्टॅन्डिंग में किए थे मुझे लगता है टेंडर प्रक्रिया 8 या 10 महिने पहले हुई थी| तो डेफीनेटली महापालिका अपने पास जो निधी है उनके पास जो फंड है उसके आधार पर टेंडर प्रक्रिया शुरु कती है| 10 महिने पहले टेंडर प्रक्रिया किया गया या उसके बाद भी स्टॅन्डिंग में पास किया गया तो वो कोई शासन के आनेवाले हक्क में नही होता वो महापालिका में प्रोव्हिजन होगा तो टेंडरींग होता है तो टेंडरींग क्यों हुई अगर हो चूकी हो स्टॅन्डिंग में पास हुई है और हम अगर फंड नही दिखा रहे है तो यह सब दिशाभूल है | पास भी कर रहे है मार्केटींग भी कर रहे है ॲक्च्यूअल में काम नही होगा यह हकीकत है | प्रशासन भूमिका क्लिअर करे ॲक्च्युअल में क्या सिच्यूएशन है और क्या क्लियारीटी है | अभी जो बात हूई थी स्व . बाळासाहेब ठाकरे और स्व . प्रमोद महाजनजी कला दालन के लिए इस बजेट में क्या प्रोव्हिजन होगा | तो स्टॅन्डिंग में टेंडर पास किया गया और टेंडर प्रक्रिया 10 महिने पहले हुई होगी क्योंकी यह विषय 3 बार आके गया था| वो टेंडर प्रक्रिया होती है वह महापालिका के पास प्रोव्हिजन होगा उस आधार पर की गई हो गया जब उस आधार पर की गई है तो महापालिका के बजेट में वह फंड होना चाहिए क्योंकी अब तो हम टेंडर भी पास कर चूके है | स्टॅन्डिंग सभी सदस्य जिम्मेदार है क्योंकी उन्होंने उस टेंडर को पास किया है | तो उसका अगर बजेट नही है तो प्रचार में हम बोली की कलादालन का काम शुरु होनेवाला है और हम यहाँ बजेट में प्रोव्हिजन नही रख रहे है| तो हम अपने ही आपको कॉन्ट्राडीक्ट कर रहे है| मतलब यह विरोधाभास है की हम पास भी करते है और बजेट भी नही देते है| तो महापालिका ने टेंडर प्रक्रिया की थी तो आपके पास उसका प्रोव्हिजन होगा और प्रोव्हिजन है तो बजेट में क्यों मेन्शन नही है|

**दिपक खांबित :-**

यह प्रशासन की तरफ से विषय दिया गया था वह 6-7 महिने पहले दिया गया था| इलेक्शन के पहले दिया गया था ऑगस्ट महिने में गोषवारा दिया था तब अपने निधी से 3 करोड और अनुदान 6

करोड की तरतूद थी करके हमने विषय दि या था| बिच में आचारसंहिता लग गई तो इस चीज में टेंडर डिले हो गया| अभी तक ऑगस्ट तक वह काम मंजूर होता था तो यह पैसे अपने पास खर्चा पडता था|

निला सोंस :-

इलेक्शन के पहले दो बार मतलब अगस्त के पहले स्टॅन्डिंग आकर गया है|

दिपक खांबित :-

आया था|

निला सोंस :-

टेंडर प्रक्रिया जब हुई तो वह उसी अमाऊंट में हुई| जो अमाऊंट आज सॅक्शन हुआ|

दिपक खांबित :-

10 करोड अपने बजेट में था|

निला सोंस :-

ॲग्री टेंडर प्रक्रिया तो........

दिपक खांबित :-

6 करोड अनुदान में था और 3-4 करोड अपना था|

निला सोंस :-

तो फिर वह कॅरीफॉरवर्ड क्यों नही हो रहा| अगर वह अनुदान में था या महापालिका का भी था तो कॅरी फॉरवर्ड क्यों नही हो रहा? टेंडर पास किया जा रहा है तो अमाऊंट कॅरी फॉरवर्ड क्यों नही हो रहा है|

दिपक खांबित :-

मॅडम अपना बजेट कॅरी फॉरवर्ड नही होता साल खतम हो गया की खतम हो गया नये साल के लिए नई करनी पडती है|

निला सोंस :-

तो अल्टीमेटली टेंडर किया है महापालिका ने तो आप ऑटोमेटीकली जिम्मेदार होता है | और स्टॅन्डिंग में हमने पास किया है तो मेरा सभापती से रिक्वेस्ट है की पास किया तो उसे कॉन्ट्राडीक्ट ना करे|

दिपक खांबित :-

अनुदान देने की गर्व्हमें ट की जो सिस्टम है उसमें कुछ काम के लिए 50 टक्के मिलता है कुछ काम के लिए 80 टक्के मिलता है| कुछ काम के लिए 90 टक्के मिलता है| और कुछ काम के लिए 100 टक्के अनुदान मिलता है| अपने को एक रुपया भी खर्चा नही पडता इसके लिए अनुदान कैसे मिलनेवाला है वह फायनल अभी हुआ नही|

स्नेहा पांडे :-

लेकिन साहब इसमें महापालिका ने टेंडर निकाला है आर इस साल 1 करोड की तरतूद लिखा है तो आगे कैसे होगा| टेंडर निकल चुका है पिछला उसमें कॅरी फॉरवर्ड नही होगा इस साल एक करोड ही तरतूद दिखा रहे है| तो काम कैसे होगा और टेंडर कैसे निकलेगा|

निला सोंस :-

महाराष्ट्र शासन के तरफ से क्या पास हुआ है| वो लिखित में जब आयेगा वो ॲडीशनल बोनस हो जाएगा बट हमने जो पास किया है स्टॅन्डिंग में जो टेंडर पास किए है उसकी हमारी क्या जिम्मेदारी है उसको लेके हम कितना ट्रान्सफरन्ट है वह यहाँ पर नही दिख रहा है|

दिपक खांबित :-

कमिशनर साहब के तरफ से एक करोड का दिखाया है दोनो के लिए|

**स्नेहा पांडे :-**

**कमिशनर साहब को आपने बताया नही था क्या की ऑलरेडी टेंडर निकला है और गया साल का कॅरी फॉरवर्ड होना चाहिए| नये में तरतूद होनी चाहिए वो टेंडर निकल चूका है उसका क्या?**

**दिपक खांबित :-**

**वो टेंडर लेट हो गया|**

**स्नेहा पांडे :-**

**वो भी कॅरी फॉरवर्ड करके इस साल तरतूद दिखाना पडेगा और इस साल का लेके पिछला कॅरी फॉरवर्ड तरतूद होगा तो आगे काम बढेगा|**

**निला सोंस :-**

**इलेक्शन के पहले कई टेंडर है.........**

**स्नेहा पांडे :-**

**शासन अनुदान.......**

**निला सोंस :-**

**कही टेंडर है जो कॅरी फॉरवर्ड हुए है वो अभी हो रहे है| ऐसे कई टेंडर है स्टॅन्डिंग में जो टेंडर पास हुए थे वह इलेक्शन के पहले के थे या इलेक्शन के बाद किए थे|**

**दिपक खांबित :-**

**इसमें आ गया ना.........**

**स्नेहा पांडे :-**

**अभी तरतूद नही रख रहे खाली एक करोड तरतूद रख रहे है| कमसे कम 10 करोड रहेगा तो हो सकता है|**

**दिपक खांबित :-**

**हमे 25 करोड अनुदान मिलनेवाला है| उसमें से पाच करोड और 20 करोड के टेंडर रेडी कर रहे है|**

**स्नेहा पांडे :-**

**अभी डिक्लेर हो गया की 25 करोड का अनुदान मिलने वाला है | लेकिन इसके पहले हम लोगने टेंडर निकाला है और बालासाहब कलादालन का काम शुरु करने जा रहे है|**

**अनिल सावंत :-**

**मा. आयुक्त साहेब, प्रमोद महाजन आर्ट गॅलरी हिंदू ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालन हे दोन विषय शहराच्या लोकांच्या सांस्कृतिक आणि भावनिक निगडीत विषय आहेत . ह्या दोन्ही विषयावर शहरात घडल ह्या दोन्ही कलादालनाचे बजेट आहे 50 करोड रुपयाचे. त्यामध्ये त्या दृष्टीकोनातून प्रोसेस सुरु होती. हिंदू ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांचे कलादालना बरोबरच प्रमोद महाजन साहेबांच्या कलादालनाचे टेंडर निघाले आहे . गेल्या वेळच्या बजेटमध्ये ऑलरेडी 10 करोडची तरतूद होती. त्या अनुषंगाने टेंडर काढले असतील. शासन अनुदान गेल्या आठवड्यात सी.एम. साहेबांनी डिक्लेअर केले आहे. ह्यावेळी बजेटमध्ये काय केले आहे की , मनपा हिस्सा स्व. प्रमोद महाजन कलादालनासाठी 25 करोड रु. आणि हिंदू ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी काहीच नाही ते आम्ही जेव्हा शासनाकडून ग्रॅन्ट येईल तेव्हा रि -ॲप्रोप्रिएशन करु. हे अन्यायकारक आहे ना . जो विषय सेन्सेटीव्ह आहे . आमची त्यांना रिक्वेस्ट हीच होती की तुम्ही हिंदू ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालना साठी ह्या बजेटमध्ये मनपा हिस्सा 10 करोडचे प्रोव्हिजन करा, तेवढाच विषय होता. प्रमोद महाजन कलादालन के लिए आपने 25**

**करोड दिया हमे कोई ऑब्जेक्शन नही आप करो| उपमहापौरजी ज्यादा बहस करके कुछ निकलने वाला नही जो आपको करना है वो आप करो और अगर आप हमारी बाते नही मान रहे तो ठराव करके हम बजेट सेक्शन खतम कर देते है|**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**आपकी बात मानते है ना|**

**अनिल सावंत :-**

**एक करोड से काम चलनेवाला नही | हमको बाळासाहेब ठाकरे कलादालन के लिए मनपा हिस्सा 100 करोड चाहिए| वो आप कहाँसे करना है देखो|**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालन व्हायला पाहिजे ह्यासाठी आपण टेंडर सुध्दा काढलेले आहे. ह्यासाठी 25 करोड शासन अनुदान पण आहे . महानगरपालिकेचा हिस्सा ज्याप्रमाणे प्रशासनाने बजेटमध्ये तरतूद केली आहे त्याप्रमाणे आपण ती करु. काम सुरु करु.**

**अनिल सावंत :-**

**प्रशासनाने तरतुद केली आहे , त्यामध्ये पुन्हा तुम्ही मिक्स करता . प्रशासनाने शासन अनुदान म्हंटलेले आहे. 42 ते 60 मध्ये जे शासकीय अनुदान म्हंटले आहे त्यातून ती तरतूद केली आहे. तो मनपा हिस्सा नाही. मनपा हिस्सा तुम्ही पूर्ण उडवला.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**बजेटमध्ये पान क्र . 39 ह्याच्यामध्ये हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालन व प्र मोद महाजन आर्ट गॅलरी मनपा हिस्सा रु . 1 कोटी व शासन अनुदान 5 करोड असे म्हटलेले आहे. तरीसुध्दा आपण शासन अनुदान 25 कोटी केलेले आहे आणि मनपा हिस्सा 1 कोटी होता तसाच ठेवलेला आहे.**

**अनिल सावंत :-**

**तुम्ही मनपा हिस्सा आत किती केला?**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**जो आहे तोच आपण ठेवला आहे.**

**अनिल सावंत :-**

**स्व. प्रमोद महाजन आर्ट गॅलरीसाठी 25 कोटी ठेवले ना.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**मी स्व. बाळासाहेब ठाकरे ह्यांचे म्हणतो.**

**अनिल सावंत :-**

**देताना दोघांचे कम्बाईंड दिले आहे.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**ते वेगळे केले. तिकडून आपण प्रमोद महाजन साहेबांचे कलादालन काढून टाकलेले आहे. फक्त हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांचे कलादालन उभारणे . मनपा हिस्सा 1 कोटी आणि शासन अनुदान 25 कोटी असे केले आहे . 1 कोटी आणि 25 कोटी टोटल 26 कोटी प्रोव्हिजन केली आहे आणि अनिलजी तुम्हांला सांगतो, ऑलरेडी टेंडर मंजूर केलेले आहे. कामाला सुरुवात पण होईल. याच्यासाठी कोणताही निधी आपण कमी पडू देणार नाही. माझी सगळ्यांना विनंती आहे ह्याच्यामध्ये राजकारण आणू नका.**

**अनिल सावंत :-**

**आम्ही अजिबात आणत नाही.**

**स्नेहा पांडे :-**

इथे 10 कोटी करा. चेण्याच्या ब्रीजचे 3 चे 5 करा.

अनिल सावंत :-

आता टेंडर निघाले आहे ते रिॲप्रॉप्रिएशन करा आपण बरचसे केले.

ध्रुवकिशोर पाटील :-

रिॲप्रॉप्रिएशन वेगळे असते.

अनिल सावंत :-

आपण मागच्या वेळी 2019-20 च्या फिगर टेंडर निघाल्यावर चेंज केले. मार्केट बांधकाम त्याचे टेंडर काढले. बिल जास्त आहेत म्हणून 1.75 केले. ह्याच्यामध्ये सुध्दा तसेच आहे ना . 6 करोडची प्रोव्हिजन आहे. 10 करोडचे टेंडर काढले आहे, ते तरी करा. तुम्ही ते पण करणार नाही, तुम्ही ते पण करणार नाही. इथे पण 1 करोड ठेवणार. 50 कोटीचे काम आहे. शासन अनुदानावर अवलंबून राहणार. 25 कोटी प्रमोद महाजन साहेबांसाठी केले ते 25 कोटी पूर्ण खर्च होणार आहेत का? ते 15 चे 10 कोटी करा.

ध्रुवकिशोर पाटील :-

शक्य नाही आता. मॅडम बोलल्या होत्या. प्रमोद महाजन आर्ट गॅलरीसाठीसुध्दा शासनाकडून अनुदान आणू या असे त्या बोलल्या.

अनिल सावंत :-

त्या काय, आम्ही सुध्दा सांगतो ना.

स्नेहा पांडे :-

आम्ही अनुदान आणू, मग पालिकेचा हिस्सा इथे देतात.

अनिल सावंत :-

पालिकेचा हिस्सा तुम्ही ठेवा. शासनाकडून अनुदान ते आम्ही बघू.

ध्रुवकिशोर पाटील :-

एका वर्षात हे काम पूर्ण होणार नाही.

स्नेहा पांडे :-

जब प्रशासनने यह विषय लाया था, प्रशासन अनुदान लाएगा तो होगा फंड नही था तो दोनो विषय नही लाने थे ना| उस वक्त प्रशासनने क्यु लाया?

राकेश शाह :-

खांबित साहेब, आपल्या महासभेपुढे स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन आणि स्व . प्रमोद महाजन कलादालन आर्थिक प्रशासकीय मंजूरीसाठी गोषवाऱ्यामध्ये किती तरतूद होती.

दिपक खांबित :-

त्याच्यात 50-50 कोटीचा प्रोजेक्ट होता त्यानंतर 2017 ला ठराव झाला . त्याच्यामध्ये मा. महासभेने स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी 25 कोटीची मंजूरी दिली आणि प्रमोद महाजन कलादालनासाठी 25 कोटीची मंजूरी दिली. 10-10 कोटीची पहिली टेंडर काढा, मग 10-10 मधले आपण परत 5-5 काढले.

ध्रुवकिशोर पाटील :-

आपण जी एक कोटीची प्रोव्हिजन केली आहे ह्याच्याने काम थांबणार नाही ना काम होणार ना.

दिपक खांबित :-

आम्ही काम सुरु केले.

ध्रुवकिशोर पाटील :-

आपण रि-ॲप्रोप्रिएशन म्हणता ना, रि-ॲप्रोप्रिएशन ॲट द एन्ड ऑफ इअर होत ते पण कस त्यांनी खर्च केला असेल तर. आता ह्याचा काय खर्च पडलाच नाही. त्याच्यामुळे हे रि-ॲप्रोप्रिएशन होतच नाही.

**अनिल सावंत :-**

पाटील साहेब, गेल्यावर्षीची हिस्ट्री काढा. मे पासून रि-ॲप्रोप्रिएशन सुरु केलेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तिथे खर्च जास्त आला म्ह णून आपण करतो . जर इथे खर्च वाढला तर आपण ते सादर करु . आपण पुन्हा ते करु शकतो.

**अनिल सावंत :-**

आमची मागणी आहे. तुम्ही कसे करायचे ते बघा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमची मागणी मान्य केली आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे ह्यांचे कलादालन करीता शासनाकडून 25 कोटी आणि ज्याप्रमाणे अंदाजपत्रकात प्रशासनाने नमूद केले आहे, 1 कोटी त्याप्रमाणे आपण त्याला मंजूरी देतो. कुठेही कमी करत नाही.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाने शासकीय अनुदान म्हंटले आहे त्यामध्ये मनपा हिस्सा आहे . 39 पेजवर मनपा हिस्सा 10 करोड पाहिजे. बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी ते तुम्ही काय करता ते बोला. नाहीतर विषय संपवून टाका. सभापती महोदय बजेट तो हो गया है, खतम कर देते है|

**मा. सभापती :-**

शासन से स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन के लिए 25 करोड आया है, मनपा से 1 करोड दे रहे है तो 26 करोड हो गया| काम चालू करने के लिए शासन से पैसे आने वाले है| काम चालु हो जाएगा तब तक शासन से अनुदान आ जायेगा|

**मा. उपायुक्त :-**

प्रोजेक्ट किती वर्षाचा आहे?

**दिपक खांबित :-**

हा प्रोजेक्ट बजेटप्रमाणे करायचा आहे. प्रोजेक्टसाठी 2-3 वर्ष लागतील.

**निला सोंस :-**

खांबितजी अभी स्टॅन्डींगमे पास किया गया था | मतलब 5-5 सी.आर. का प्रमोद महाजन के लिए बालासाहेब ठाकरे ग्राउंड तो वर्कऑर्डर इम्प्लीमेंट हो गया काम शुरु होगा?

**दिपक खांबित :-**

होगा|

**निला सोंस :-**

मतलब प्रोव्हीजन नही है तो वर्क व्हील स्टार्ट|

**दिपक खांबित :-**

शुरु करेंगे|

**निला सोंस :-**

वर्क स्टार्ट, पाटील साहब आपने बताया स्व. प्रमोद महाजनजी का हटा दिया गया|

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वो नेक्स्ट पेज मे है|

**निला सोंस :-**

उसमे 25 का प्रोव्हिजन है?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कर रहे है | मेरी सबसे विनंती है की , यह प्रोजेक्ट 3 साल से भी ज्यादा जायेगा और अच्छी प्रोजेक्ट बनने वाली है | इसमे इसमे 1 करोड रखो या 25 करोड कोई इम्पॉर्टंट नही है, आराम से काम होगा| मेरी आपसे बिनती है की, इसको हो जाने दो और हम सब अच्छी तरह से व्यवस्थित डेव्हलप करेंगे|

**अनिल सावंत :-**

50 करोड का प्रोजेक्ट पूरा 100% राज्य शासन पे डिपेन्ड है उसमे से 25 आनेवाले है तो मनपा का हिस्सा इस साल क्यु नही रख रहे है|

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जरुरत नही|

**अनिल सावंत :-**

क्यु जरुरत नही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इस 25 कम होना ही नही|

**अनिल सावंत :-**

5 करोड का ऑलरेडी टेंडर निकाला है|

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इतना खर्चा बढाया है तो इन्क्म.......

**अनिल सावंत :-**

स्व. प्रमोद महाजन का 25 करोड मे होने वाला है क्या? नही ना|

**दिनेश जैन :-**

लेकीन वो मेसेज गलत नही जाये इसके लिए 25-25 कर दिया|

**अनिल सावंत :-**

वो 100% मनपासे कर रहे है|

**(सभागृहात गोंधळ)**

**अनिल सावंत :-**

आप ऐसा करोगे तो मेसेज गलत जायेगा|

**दिनेश जैन :-**

25 इनको, 25 उनको वहापे गलत जायेगा|

**अनिल सावंत :-**

ज्यादा बहस करके मतलब नही है, आगे प्रोसीड करते है|

**दिनेश जैन :-**

सावंत साहेब, 25 करोड आनेवाला नही है ऐसा आपको डाऊट है क्या?

**अनिल सावंत :-**

50 करोड का प्रोजेक्ट है| 2 साल से इसके पिछे पडे है| दोनो कलादालन है| 25 आयेगा पर 50 करोड प्रोजेक्ट है| मनपा हिस्सा कुछ भी नही दे रहे है| दॅट इज इश्यु, यह शासन का अनुदान दे रहे है|

अनिल सावंत :-

उपमहापौरजी, बजेट ज्यावेळी सुरु झाले त्यावेळी मी 2-3 सुचना केल्या होत्या. त्या कशाप्रकारे आपण घेवू शकतो ते बघा. इन्कम कमी न होता त्यामध्ये हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनचे आहेच, बाबासाहेब आंबेडकरांसाठी सांस्कृतिक भवनासाठी एक करोडची तरतूद केली आहे . शासनाचे 12 करोड आहेत आपले 1 करोड आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर 500 फुटाची जी घरे आहेत त्यांना मालमत्ता करामध्ये पूर्ण सुट देण्यात यावी आणि थकबाकीदारामध्ये लावण्यात येणाऱ्या व्याजदरात 50 टक्के कपात करण्यात यावी. उद्योगधंद्यांमध्ये आलेली मंदी लक्षात घेता वाणिज्य आस्थापनात लावण्यात आलेली मालमत्ता करामध्ये आणि परवाना शुल्कामध्ये 50 टक्के सुट देण्यात यावी. परवाना शुल्काचा ठेका रद्द करुन मनपातर्फे परवाना शुल्काची वसुली करण्यात यावी . ते आपण केलेले आहे. कन्टीन्यू करु नये. शाळेच्या विषयावर जास्त बोलण झालेले नाही.

हसमुख गेहलोत :-

व्याजामध्ये 50 टक्के सुट परवाना रद्द करण्यात यावे.

अनिल सावंत :-

परवाना 50 टक्के रद्द नाही. इंडस्ट्री और शॉपकिपर है उनको जो परवाना देते है और प्रॉपर्टी टॅक्स देते है| पुरे देश मे जो आर्थिक मंदी ध्यान मे रखते हुए 50 टक्का उनको कन्सीनेशन परवाना और प्रॉपर्टी टॅक्स इस शहर मे जो दुसरे बोर्ड है सी .बी.एस.सी., आय.सी.एस.सी. उनका आप देखेंगे तो उनका फीज जादा है| स्कुल स्टॅन्डउर् है तो जो एस.एस.सी. स्कुल के बोर्ड है और एच.एस.सी. का स्कुल का बोर्ड है तो 50 टका प्रॉपर्टी टॅक्स मे कन्सीशन दे रहे है| एच.एस.सी. और एस.एस.सी. के बोर्ड और मुंबई विद्यापिठ से संलग्न जो कॉलेजेस है उनसे जो प्रॉपर्टी टॅक्स लेते है वो माफ किया जाए|

श्रीप्रकाश सिंग :-

परवाना और टॅक्स 50 टका गाले वाले का|

अनिल सावंत :-

पाणी गळती जे 30 टक्के पर्यंत आपल्याला सांगितले होते , ती 30 टक्के गळती कमी करुन उत्पन्न आपण 82 टक्के वाढवले आहे. मध्यंतरी कर्मशियलला जो 10 चा रेट 13 केला नंतर 50 रु. केला. त्यामुळे रिकव्हरीचे जे प्रमाण होते कॉस्ट वाढली परंतु ज्या प्रमाणात रिकव्हरी व्हायला पाहिजे होती ती त्या प्रमाणात झाली नाही आणि अॅव्हरेज बिलसुध्दा गेली. तो दर 13 चा 10 करण्यात यावा आणि मॅक्झीमम रिकव्हरी आता 70 ते 75 टक्के होत असेल काही ठिकाणी तीन लाईन आहे त. फक्त दोन लाईनचेच बिल जाते. असा पूर्ण जी.पी.एस. सर्व्हे करुन ती रिकव्हरी करण्यात यावी आणि ह्या नागरीकांना त्याचा फायदा देण्यात यावा. 13 चा 10 आणि 50 चा 25. दुसरा एक महत्वाचा विषय होता. राई, मुर्धा, मोर्वा, उत्तन, डोंगरी ह्यांना आपण अंडरग्राऊंड ड्रेनेज जसे भाईंदर इस्टचे पण आहे नवघर एरिया 2008 साली टॅक्स लावला. प्रॉपर्टी टॅक्स वर 8 टक्के टॅक्स लावला आहे. मलप्रवाह सुविधा कर त्याचा सर्व्हेसुध्दा झालेला नाही. त्याचा आपण जवळजवळ 12 वर्षापासून टॅक्स घेतो. त्यामध्ये अमाऊंट लहान असेल परंतु इतर शहर ती सोयीसुविधा घेते पण त्या भागाला ती सुविधा मिळाली नाही. तरीसुध्दा आपण त्यांच्याकडून टॅक्स घेतो. आपण तिथे काम सुरु करत नाही. 12 वर्षाचा डिफरन्स आहे ते कसा देता येईल ते बघा. 8 टक्के जो मलप्रवाह सुविधा कर ह्या एरियासाठी माफ करण्यात यावा. ह्याच्यामध्ये महिला बचत गटासाठी प्रोव्हिजन केलेली आहे का? ओव्हर ब्रीज 5 कोटीची तरतूद करण्यात यावी . अल्पसंख्यांक के लिए एक निधी रहता है, शासन अनुदान रहता है जिसका 20 लाख का निधी है हम उसके उपरही डिपेन्ड रहते है वो

निधी भी शासन से आता नही तो उसके लिए मनपा की तरफ से कुछ स्पेशल हिस्सा रखा जाए वो एरिया बहूत निग्लेक्टेड हुआ है| काफी जगह पे है तो अल्पसंख्यांक विभाग के लिए कुछ निधी रखा जाए|

धृवकिशोर पाटील :-

मा. सभापती साहेब, अनिलजी ने जो 5-6 पॉईंट्स रखे है आपल्याला माहिती आहे कोणतीही दरवाढ किंवा दरघट करायची असेल तर महासभेमध्ये 20 फेब्रुवारीच्या आत जर आपण ती पास केली तरच त्याचा इफेक्ट येणाऱ्या वर्षात देऊ शकतो.

अनिल सावंत :-

ती वाढ वाढीसाठी आहे.

धृवकिशोर पाटील :-

वाढीसाठी आणि कमीसाठी दोघांसाठी.

शरद बेलवटे :-

साहेबांनी सांगितले आहे त्याच्यामध्ये तुमचा जो इन्कम साईड ती कमी होणार आहे . ऑलरेडी जर आपण असे करायला गेलो , लावलेले दर कमी करायला घेतले . आता मी जे रेटींग घेतो ते रेटींग खाली आहे. रेटींग खाली आले तर मार्केटमध्ये तुम्हाला कोण उभं करणार नाही . वित्तीय संस्था कर्जपण देणार नाही. कारण तुमची रि-पेमेन्ट कॅपिसीटी पूर्ण कोलॅप्स होईल. हा महत्वाचा मुद्दा फायनलच्या दृष्टीकोनातून मी बोलतो कुठची दरवाढ 22 फेब्रुवारीच्या अगोदर झाली तर ती आपण ह्याच्यात इन्क्ल्यूड करत असतो.

अनिल सावंत :-

वाढीचे ठिक आहे कमी करायचे असेल तर.

शरद बेलवटे :-

सगळे त्याच्यातच आहे.

धृवकिशोर पाटील :-

आपण ज्या ज्या वेळी दरवाढ केली, करवाढ केली बाकायदा स्टॅन्डीग कमिटीच्या मिटींगमध्ये पास करुन महासभेमध्ये 20 फेब्रुवारीच्या त्याची मंजूरी घेऊनच आपण दरवाढ करवाढ कमी जास्त केलेली आहे. त्याप्रमाणे 500 चौ.फु. जो मुद्दा मांडला थकबाकीदाराचे व्याजदरामध्ये कपात करायलासुध्दा मांडला. आम्ही पण त्या मताशी सहमत आहोत. परंतु ज्याप्रमाणे आपले अकाऊंट ऑफीसर बेलवटे साहेबांनी सांगितले की संपूर्ण मनपाचे बजेट हे कोलमडून जाईल . काल आपले कर निर्धारक दोंदे साहेब आले होते. त्यांना पण जेव्हा हा मुद्दा सांगितला त्यांनी सांगितले आपल्या आस्थापनावरती जवळजवळ 70 टक्के 500 चौ. फुटाच्या आतमध्ये आहेत आणि ह्याच्यामध्ये जर हा डिसीजन घेतला तर आपले पूर्ण बजेट कोलॅप्स होऊन जाईल.

अनिल सावंत :-

त्यांनी किती आस्थापना सांगितल्या?

धृवकिशोर पाटील :-

साडेतीन लाख आस्थापना आहेत. त्याच्यामध्ये 500 चौ.फु. आतमध्ये 70 टक्के आस्थापना आहेत. हे जर कमी केले तर आपले पूर्ण बजेट कोलमडेल. तुमच्या मताशी आम्हीपण सहमत आहोत . आम्हाला पण करायचे आहे. शेवटी आपल्याला मिरा भाईंदर शहराचा विकास पण करायचा आहे. उरलेली कामे पण करायची आहेत. हे सगळं करताना इट्स व्हेरी डिफीकल्ट ठाणे आपल्या बाजुची महापालिका आहे . त्यांनी पण हाऊस टॅक्समध्ये दरवाढ केली पाण्यामध्ये दरवाढ केली , वाणिज्यामध्ये पण दरवाढ केली. कारण जे येणारे खर्च आहेत ते खर्च नीट करण्यासाठी प्लस ठाणे शहराचा विकास करण्याचे हे केले आहे . हीच परिस्थिती आपल्या मिरा भाईंदर शहराची आहे . तुम्ही जर बघितले तर आपला मेन इन्कम सोर्स हाऊस

टॅक्स आहे. पाण्यामध्ये 30 करोड लॉस्टमध्ये आहोत. आपल्याला नगररचना मधून 60 करोड मिळतात. दोन सोर्स मेन आहेत . दुसरा सोर्स आपल्याकडे नाही . आरोग्यामध्ये आपण मायनस आहोत . प्रत्येक डिपार्टमेन्ट मायनसमध्ये आहोत. म्हणजे आपल्याला दोनच सोर्स मधून इन्कम आहे. समजा, आपली 100 करोडची वसूली आहे ही जर 50 करोड पेक्षा खाली आली तर ह्यांना पगार करणे मुश्कील होऊन जाईल . म्हणजे मिरा भाईंदरमध्ये आर्थिक तंगी आली . जेवढे आपले उपक्रम चालू आहेत त्यांना फंड मिळणे इट्स व्हेरी डिफीकल्ट. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे . बाकी जेवढे आपण सजेशन दिलेले आहेत, सजेशन इम्प्लीमेन्ट करुच परंतू हा तो करवाढ आणि दरवाढचा विषय आहे हा आपण कमी करु शकत नाही . प्रशासनाचे पण तेच मत आहे. माझी तुम्हा सगळ्यांना विनंती आहे की तुम्ही सांगितले सेगळे मुद्दे आम्ही तुम्हाला व्यवस्थित समजावून सांगितले आहेत. माझे असे मत आहे हा जो ब जेट आहे हा सर्वानुमते पास केला तर आम्ही तुमचे खुप आभारी राहू. मा. सभापती साहेब, आपण ज्या सदस्यांनी सुचना दिल्या आहेत त्याचे इम्प्लीमेन्टेशन करा . बेलवटे साहेब जे खर्च वाढले आहेत जे इन्कम वाढले आहे त्याचा थोडासा ताळमेळ करा. काही कुठे कमी जास्त करुन तुम्हाला करायचे आहे. आपण ह्याच्यामध्ये म्हंटलेले आहे . अनु. क्र. 40 ते 60 हे शासनाच्या अनुदानातून करणार आहोत. ते शासनाच्या अनूदानातुनच करा. त्यासाठी महापालिकेचा फंड यूज करु नका . त्याच्यावर लिहा शासनाचे अनुदान आले की , हे करायचे. त्याचप्रमाणे हिंदू हृदयसम्राट बाळासाहे ब ठाकरे ह्यांच्या कलादालनाकरीता प्रशासनाने जो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, महापालिकेचा हिस्सा तो ठेवा. त्याच्यानंतर शासन अनुदान ठेवा.

अनिल सावंत :-

किती नंबरवर टाकला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

39. शासनाचे 5 कोटी आहे तिकडे 25 कोटी करा. मा. आयुक्त मिरा भाईंद र महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये मा . आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ /घट आणि सुधारीत अंदाजपत्रकातील वाढ /घट त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु.२१.०० लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे . अंतिम मान्यतेसाठी मा . महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2019-20 चे सुधारीत | 2020-21 चे मुळ |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास = एकूण जमा | 119277.15 | 181283.97 |
| सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास = एकूण खर्च | 118605.15 | 181262.97 |
| अखेरीची शिल्लक | **672.00** | **21.00** |

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा व अंतिम मान्यतेसाठी मा . महासभेपुढे सादर करण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

- महाराष्ट्र महाविकास आघाडी सरकारने हिंदू हृद्य सम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालन तयार करणेसाठी 25 कोटी निधी मंजूर केलेला आहे . त्याचा या अर्थसंकल्पात समावेश करण्यात यावा . तसेच या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये या कलादालनासाठी मनपा हिस्सा रु. 10 करोडची तरतूद करण्यात यावी.
- आर्थिक मंदी , बेरोजगारी आणि नागरीकांच्या उत्पन्नात झालेली घट लक्षात घेऊन मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर शहरातील 500 चौ. फुटपर्यंतच्या सदनिकांना मालमत्ता करामध्ये पूर्ण सुट देण्यात यावी. थकबाकीदारांना लावण्यात येणाऱ्या व्याज दरामध्ये 50% कपात करण्यात यावी.
- उद्योग धंद्यामध्ये आलेली मंदी लक्षात घेता वाणिज्य आस्थापनांना लावण्यात येणाऱ्या मालमत्ता करामध्ये व परवाना शुल्कामध्ये 50% सुट देण्यात यावी. परवाना शुल्काचा ठेका रद्द करुन मनपातर्फे परवाना शुल्काची वसुली करण्यात यावी.
- इतर बोर्डाच्या शाळांबरोबर असलेली स्पर्धा लक्षात घेवून SSC व HSC बोर्ड शाळा व मुंबई विद्यापिठाशी संलग्न महाविद्यालयांना मालमत्ता करामध्ये पूर्ण सुट देण्यात यावी
- पाणी गळतीचे प्रमाणे कमी करुन गृह सदनिकांना लावण्यात येणारा पाणी दर रु . 10.00 प्रती 1000 ली. व वाणिज्य सदनिकांना लावण्यात येणारा पाणी दर रु. 25.00 प्रती 1000 लिटर इतका करण्यात यावा.
- राई, मुर्धा, मोर्वा व उत्तन डोंगरी या परिसरात भुमिगत गटार योजनेचे काम अद्याप सुरु झालेले नाही त्यांना सन 2008 पासून लावण्यात येणारा 8% मलप्रवाह सुविधा कर हा त्यांच्यावर अन्याय आहे तरी तो पूर्णपणे माफ करण्यात यावा.
- उत्तन येथील घनकचरा प्रकल्प सकवार येथे स्थलांतरीत करण्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात यावी.
- मनपा शाळांमध्ये 8 वी ते 10 वी वर्ग चालू करण्यासाठी व इंग्रजी माध्यम सुरु करण्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात यावी व प्राधान्य देण्यात यावे
- शहरामध्ये सुसज्ज क्रिडा संकुल उभारण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये आर्थिक तरतूद करण्यात यावी.
- चेना गाव येथे नदीवर ब्रीज बांधण्यासाठी रु. पाच कोटीची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात यावी.
- या अर्थसंकल्पामध्ये मा . आयुक्त यांनी मंजूरी दिल्याशिवाय कोणत्याही विकास कामाचा समावेश करण्यात येवू नये.
- महिला बचतगट भवन बांधण्यासाठी रु. 2 कोटी तरतूद करण्यात यावी.

**स्नेहा पांडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 161 करीता दोन ठराव आलेले आहेत . पहिला ठराव सुचक श्री . ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक श्री. राकेश शहा. दुसरा ठराव सुचक श्री . अनिल सावंत अनुमोदन श्रीम . स्नेहा पांडे ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी हात वर करायचे आहेत . ठरावाच्या विरोधात मतदान हात वर करा तटस्थ कोणी आहे का? सुचक ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक श्री. राकेश शाह ह्यांच्या ठरावाच्या बाजूने विरोधात हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांच्या ठरावाच्या बाजूने 10 विरोधात 6, श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा ठराव बहुमताने मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. 161 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण")

**ठराव क्र. 134 :-**

**मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ /घट आणि सुधारीत अंदाजपत्रकातील वाढ /घट त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु .२१.०० लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.**

**(रु. लाखांत)**

| तपशिल | 2019-20 चे सुधारीत | 2020-21 चे मुळ |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास = एकूण जमा | 119277.15 | 181283.97 |
| सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास = एकूण खर्च | 118605.15 | 181262.97 |
| अखेरीची शिल्लक | **672.00** | **21.00** |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक सूर्यदेव तिवारी | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | निरंक |
| २ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | २ | श्री. एलायस दुमिंग बांड्या | |
| ३ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | ३ | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | |
| ४ | श्री. श्रीप्रकाश सिंह (मुन्ना सिंग) | ४ | श्री. कमलेश यशवंत भोईर | |
| ५ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | ५ | श्री. अनिल दिवाकर सावंत | |
| ६ | श्रीम. निला बर्नाड सोन्स | ६ | श्रीम. गिता हरिष परदेशी | |
| ७ | श्री. संजय अनंत थेराडे | | | |
| ८ | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | | | |
| ९ | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी | | | |
| १० | श्री. दिनेश तेजराज जैन | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**
**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

**कलम के अन्वये प्राप्त प्रस्ताव. मिरारोड (पूर्व) स्टेशन समोरील चौकात वीर स्मृती स्मारक अंतर्गत फायबर पुतळा उभारणेच्या खर्चास मान्यता देणे.**

**हसमुख गेहलोत :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) येथे स्टेशन लगत समोरील वाहतूक बेटाची निर्मिती करुन वाहतूक बेटाचे सुशोभिकरण करणे कामाकरीता आमदार निधीतून रु . २५.०० लक्ष रक्कम मंजुर होऊन सदर कामाची निवीदा प्रक्रिया करुन सदर काम मे . सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर यांना देण्यात आलेले**

आहे. परंतु मा. महासभेने दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र. ५८ अन्वये सदर ठिकाणी चौकात वीर स्मृती स्मारक बांधण्यास मान्यता दिलेली असल्याने सदर रु २५.०० लक्ष रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन घेऊन सदर कामांतर्गत चौथरा बांधून परिसराचे सुशोभिकरण करण्यास व स दर काम मे . सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडून करुन घेण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदर चौथऱ्यावर शहीद कौस्तुभ राणे स्मारकासाठी १०.५ फुट उंच फायबरचे Sculptur बणवावयाचे आहे. सदर काम हे मे. सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदाराकडूनच करुन घेण्या स व सदर कामासाठी रु. २५.०० लक्ष रुपये खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण पाच दो न (दोन) अन्वये मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास ही मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

**प्रकरण क्र. 162 :-**

मिरारोड (पूर्व) स्टेशन समोरील चौकात वीर स्मृती स्मारक अंतर्गत फायबर पुतळा उभारणेच्या खर्चास मान्यता देणे.

**ठराव क्र. 135 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) येथे स्टेशन लगत समोरील वाहतूक बेटाची निर्मिती करुन वाहतूक बेटाचे सुशोभिकरण करणे कामाकरीता आमदार निधीतून रु . २५.०० लक्ष रक्कम मंजुर होऊन सदर कामाची निवीदा प्रक्रिया करुन सदर काम मे . सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर यांना देण्यात आलेले आहे. परंतु मा. महासभेने दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र. ५८ अन्वये सदर ठिकाणी चौकात वीर स्मृती स्मारक बांधण्यास मान्यता दिलेली असल्याने सदर रु २५.०० लक्ष रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन घेऊन सदर कामांतर्गत चौथरा बांधून परिसराचे सुशोभिकरण करण्यास व सदर काम मे . सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडून करुन घेण्या स मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदर चौथऱ्यावर शहीद कौस्तुभ राणे स्मारकासाठी १०.५ फुट उंच फायबरचे Sculptur बणवावयाचे आहे. सदर काम हे मे. सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदाराकडूनच करुन घेण्यास व सदर कामासाठी रु . २५.०० लक्ष रुपये खर्चास मान्यता देण्या त येत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण पाच दोन (दोन) अन्वये मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास ही मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हसमुख गेहलोत                    अनुमोदक :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ सायं. ५.०० वाजता)

सही/-

सभापती

स्थायी समिती

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

